PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 4, ISSUE 1

सांप्रदायिक अंगाने मध्ययुगीन मराठी वाङ्मयेतिहासलेखन

श्री वैजिनाथ राख
शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय
वडगाव बु पुणे ४६
महाराष्ट्र भारत

मध्ययुगीन मराठी वाङ्मय हे प्रामुख्याने धर्म—पंथ—संप्रदाय यांची निर्मिती आहे. वाङ्मयनिर्मितीची केंद्रे मठ, मंदिरे, देवळे ही होती. हे असे का होते? धर्म पंथ संप्रदायांची निर्मिती का झाली? परकीय राजवटीमुळे झाली की, भारतीय—महाराष्ट्रीय माणूस मुळातच सांप्रदायिक आहे? तसेच या संप्रदायांवर अनेक आक्षेप घेतले जातात. वारकऱ्यांना संथाळे, महानुभावांना मानभावी, तसेच निवृत्तिवादी—प्रवृत्तिवादी असेही आक्षेप, टीका केल्या जातात. तसेच अनेकजण यांची स्तुतीही करतात. एकाच गोष्टीबद्दल इतका विरोधाभास का? यांचे उत्तर पारंपरिक वाङ्मयेतिहासात सापडत नाही. त्यामुळे काहीजणांनी सांप्रदायिक अंगाने वाङ्मयेतिहास लिहिलेले दिसतात. कारण अशा धर्म—पंथ—संप्रदायांचा स्वतंत्र वाङ्मयेतिहास लिहिला, तर त्यातून काही वेगळी माहिती हाती लागेल. यातूनच अनेकांनी असे वाङ्मयेतिहासलेखन केलेले आहे.

यामध्ये प्रामुख्याने नाथ संप्रदाय, वारकरी संप्रदाय, महानुभाव पंथ, समर्थ संप्रदाय यावर जास्त लेखन झालेले दिसते. वीरशैव व सूफी संप्रदाय यांवर थोडेफार लेखन झाले. नागेश, अनंत, चैतन्य व गाणपत्य यांचा एखादा अपवाद वगळला, तर यांचे वाङ्मयेतिहासलेखन दिसत नाही. यातील काही प्रातिनिधिक वाङ्मयेतिहास पुढीलप्रमाणे : वारकरी संप्रदाय — 'वारकरी पंथाचा इतिहास' (१९५८) सोनोपंत दांडेकर, 'वारकरी संप्रदाय उदय व विकास' (१९८८) बहिरट भा.पं.; 'वारकरी पंथाचा

इतिहास' (१९९५) पाटील शंकर विठोबा इत्यादी. महानुभव पंथ — 'महानुभाव पंथ आणि त्यांचे वाङ्मय', शं. गो. तुळपुळे ; 'महानुभाव इतिहास प्रकरण' (१९६५) अ. का.प्रियोळकर, 'महानुभाव पंथ' (१९४७), शास्त्री बाळकृष्ण महानुभाव इ. दत्त संप्रदाय — 'दत्त संप्रदायाचा इतिहास' (१९५८) रा.चिं.ढेरे ; समर्थ संप्रदाय — 'श्री समर्थ व समर्थ संप्रदाय' (१९८१), र.रा.गोसावी इ. नाथ संप्रदाय — 'नाथ संप्रदाय उदय व विस्तार' (१९७७) प्र. न. जोशी ; 'नाथ संप्रदायाचा इतिहास' रा.चिं.ढेरे (२००९); 'नाथ संप्रदाय', म.रा.जोशी इ.

सांप्रदायिक अंगाने इतके वाङ्मयेतिहास लिहिले गेले, तरीही समतोल व निरपेक्ष दृष्टीने समग्र वाङ्मयेतिहास निर्माण होण्यात अनेक अडचणी आहेत. कारण काही वाङ्मयेतिहास हे पूर्वग्रहदूषित दृष्टिकोनातून सिद्ध झालेले दिसतात. उदा. पाटील शंकर विठोबा यांचा 'वारकरी पंथाचा इतिहास (काल सूचीसह)' यात लेखकाने संत नामदेवांना वारकरी संप्रदायाचे प्रवर्तक, उद्गाते म्हटले आहे. परंतु हे म्हणत असताना, संत ज्ञानदेवांच्या कार्यावर अनेक ठिकाणी खालच्या स्तरावर टीका केली आहे. एक व्यक्ती मोठी आहे, असे सांगण्यासाठी दुसरीला वाईट म्हणावेच लागते का? असाही प्रश्न पडतो. परंतु असे नसून त्या दोन्हीही व्यक्ती आपापल्या जागी श्रेष्ठ व मोठ्या आहेत, हेही आपण वृथा अभिनिवेशात विसरतो. या वर द.दि. पुंडे म्हणतात की, ''संत वाङ्मयाचा इतिहास लिहिण्यातील सर्वात मोठी अडचण म्हणजे, हे संत ज्या पंथातून किंवा परंपरेतून आलेले असतात, त्या पंथाचे व परंपरेचे यथोचित प्रमाण इतिहास उपलब्ध नसणे, ही होय. महाराष्ट्रातील विविध धार्मिक परंपरा, पंथ, संप्रदाय यांचे निराभिमान व निराभिनिवेष प्रमाण इतिहास उपलब्ध होणे, ही मध्ययुगीन मराठी वाङ्मयेतिहासलेखनाची मोठीच गरज आहे. मध्ययुगीन महाराष्ट्राचा चांगला समाजेतिहास, सांस्कृतिक इतिहास लिहिला गेला नाही. हेच आपले मूळ दुखणे आहे. ''[१] आणि हे खरेही आहे. कारण आपल्याला असा वाङ्मयेतिहास निर्माण करावयाचा असेल, तर आपला पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन बाजूला ठेवला पाहिजे.

वैचारिक व तात्त्विक अंगाने वाङ्मयेतिहासलेखन :

वैचारिक व तात्त्विक या दृष्टिकोनातूनही धर्म—पंथ—संप्रदायांचे वाङ्मयेतिहासलेखन झालेले दिसते. हे लेखन मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा उलगडा होण्यास दिशा देणारे ठरले आहे, असे दिसते. संत प्रवृत्तीवादी होते की निवृत्तिवादी, टाळकुटे व राष्ट्रबुडवे होते का समाजसुधारक होते. या प्रश्नांची उत्तारे देण्याचे काम

काही लेखकांनी केले. मध्ययुगातील धर्म—पंथ—संप्रदायांच्या कार्यांची व वाङ्मयांची वेगळी मांडणी केली. यात सर्वात वरचे नाव येते ते म्हणजे 'संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती' (१९५०) सांगणारे गं. बा. सरदार यांचे. यांनी वारकरी संप्रदायाचा कालक्रमाणे इतिहास सांगण्याचा प्रयत्न केला नाही, तर संतानी १३व्या शतकात कशी 'आध्यात्मिक लोकशाही' निर्माण केली व १७ व्या शतकात तिच्यावर कळस चढवण्याचे काम कसे झाले. हे सामाजिक अंगाने सांगितले. ते म्हणतात, ''ज्ञानेश्वर तुकारामादी मराठी संताचे कार्य हे केवळ सांप्रदायिक स्वरूपाचे नसून ती एक व्यापक चळवळ होती. त्यांचा वारकरी संप्रदाय हा काही विठ्ठलोपासकांचा एक साधासुधा भक्तिपंथ नव्हता, तर शैव, नाथ, दत्त, चैतन्य, अनंद, सूफी इत्यादी पंथांतील उदार चिंतनशील व संस्कारक्षम भक्तजणांना सामावून घेणारे ते एक सर्वसंग्राहक उपासनासपीठ होते. एक प्रभावी सांस्कृतिक केंद्र होते.''[२] असे सांगून त्यांनी वारकऱ्यांचा व वारकरी संप्रदायाचा सामाजिक दृष्टिकोन सांगितला.

याच आशयाचे आणि तात्त्विक विचार असणारे वारकरी संप्रदायावरील ग्रंथ म्हणजे 'मराठी संतांचे सामाजिक कार्य' (१९८४), वि.भि.कोलते, 'वारकरी पंथाचा इतिहास' (१९९१) पाटील शंकर विठोबा, 'संत साहित्य व लोकसाहित्य : एक अनुबंध', (१९७८) रा.चिं.ढेरे, 'पाच भक्तिसंप्रदाय' र.रा.गोसावी, 'मराठी सत्तेचा उदय' म.गो. रानडे इत्यादी काही ठळक नावे सांगता येतील. यांनी वारकरी संप्रदायाची वेगवेगळ्या अंगांनी मांडणी करून या संप्रदायाला एक सामाजिक अधिष्ठान प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला.

यानंतर 'महाराष्ट्रीय संत मंडळाचे ऐतिहासिक कार्य' (१९४८) हा ग्रंथ लिहून बा.र.सुंठणकर यांनी संत वाङ्मयाची मार्क्सवादी दृष्टिकोनातून मांडणी करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी या ग्रंथात 'साहित्य आणि समाज' हे सूत्र गृहित धरून ही मांडणी केलेली आहे. मार्क्सवादी भूमिका घेऊन संत साहित्याची ऐतिहासिक, परिस्थितीनिष्ठ मीमांसा करण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचे वाङ्मयप्रकारानुसार लेखन झाल्याचे त्रोटक प्रयत्न दिसतात. त्यात श्री.रं.कुलकर्णी यांचा, 'ओवी ते लावणी' हा ग्रंथ लक्षणीय आहे. या शिवाय वाङ्मयप्रकारानुसार संशोधन व अभ्यास झालेला दिसतो. त्यात, 'मराठी आख्यान कविता'—गं.बा.ग्रामोपाध्ये, 'मराठी बखर'—संकपाळ बापूजी, 'गौळण'—वंसत स. जोशी, 'आरती'—म.वि.गोखले इत्यादी. तसेच विद्यापीठीय पातळीवरही

वाङ्मयप्रकारांच्या अंगाने संशोधन व अभ्यास होताना दिसतो. परंतु वाङ्मयप्रकारांनुसार वाङ्मयेतिहासलेखन झालेले दिसत नाही.

संदर्भ

१. कल्याण काळे व रा.शं नगरकर (संपा), 'संत साहित्य : अभ्यासाच्या काही दिशा', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, पहिली. आ. १९९२ पृ. क्र. १०२.

२. गं. बा. सरदार, 'संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती', लोक वाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, सहावी आ. २००५, पृ. क्र. १३८.